जिल्हा परिषदेच्या अंतर्गत कर्मचा-यांनी
मुख्यालयी राहण्याच्या दृष्टीने आवश्यक सूचना

**जिल्हा परिषद औरंगाबाद**
**सामान्य प्रशासन विभाग**
**परिपत्रक क्रमांक जिपऔ/साप्रवि-३/कावी/२०२२/७०२/२८०८**
**दिनांक:-20 सप्टेंबर २०२२**

वाचा:-१.शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेपुर-१२८७/६४३/सेवा-१०,दिनांक २५.०४.१९८८
२.शासन निर्णय क्रमांक घभाभ-१०८९/प्र.क्र.१०/सेवा-५,दिनांक ०५.०२.१९९०
३.ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक अराप/२००८/प्र.क्र.२३२/आस्था-९,दिनांक ०५.०७.२००८
४.ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक अराप/२००८/प्र.क्र.२३२/आस्था-९,दिनांक ०३.११.२००८
५.वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक घभाभ १०१५/प्र.क्र.०१/सेवा ५,दिनांक ०७.१०.२०१६
६.शासन परिपत्रक क्रमांक पंरास २०१८/प्र.क्र.४८८/आस्था-७,दिनांक ०९.०९.२०१९
७.जिल्हा परिषद,औरंगाबादकडील परिपत्रक क्र.जिपऔ/ साप्रवि-३/कावी/२०२१/१११६/४४१६, दिनांक ०८.१२.२०२१
८. जिल्हा परिषद,औरंगाबादकडील परिपत्रक क्र.जिपऔ/ साप्रवि-३/कावी/२०२२/४८९/२०७३, दिनांक ३०.०६.२०२२

**प्रस्तावना:-**

ग्रामविकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या ग्रामस्तरीय कर्मचाऱ्यांचे संदर्भात उपरोक्त संदर्भामध्ये खालीलप्रमाणे शासन संदर्भ,शासन निर्णय / परिपत्रकानुसार दिलेल्या सूचनांचा संक्षिप्त सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) वित्त विभागाचा शासन निर्णय दिनांक २५ एप्रिल,१९८८ मधील परिच्छेद ४ नुसार ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांचे बाबतीत कामाच्या ठिकाणी राहण्यासाठी संबंधात कर्मचारी घरभाडे भत्त्याच्या पात्रतेसाठी संबंधित कर्मचाऱ्यांने जोडपत्र-२ मध्ये द्यावयाचे प्रमाणपत्र संदर्भात विहित केलेली शर्त ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत काढून टाकण्यात येत आहे असा उल्लेख केला आहे.

२) वित्त विभागाकडील शासन निर्णय दिनांक ०७ ऑक्टोंबर,२०१६ नुसार उपरोक्त तरतूद वगळण्यात आली आहे. याचाच अर्थ आता ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांना सुध्दा प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्यात किंवा ज्यावेळी प्रमाणपत्राच्या मसुद्यात बदल होईल त्या त्या वेळी ते घरभाडे भत्त्यासाठी काही खर्च/घरभाडयापोटी अंशदान करीत आहे अशा आशयाचे प्रमाणापत्र प्रस्तुत करणे आवश्यक आहे. जर अशी पूर्तता झाली तर सर्व कर्मचा-यांना भाडे पावती सादर न करता घरभाडे भत्ता देय असणार आहे.

Scanned with CamScanner

३) ग्रामविकास विभागाकडील दिनांक ५ जुलै, २००८ रोजीच्या परिपत्रकानुसार मुख्यालयी न राहणा-या कर्मचाऱ्यांवर कठोर कार्यवाही करावी व अशी कार्यवाही न करणाऱ्या जबाबदार असणाऱ्याविरुध्द सुध्दा कार्यवाही करावी आणि मुख्यालयी न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्ता रोखावा अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

४) ग्रामविकास विभागाकडील शासन पूरक पत्रक दिनांक ०३ नोव्हेंबर,२००८ नुसार मुख्यालयात न राहाणा-या कर्मचाऱ्यांसदर्भात घरभाडे भत्ता रोखण्यात यावा व अशी कार्यवाही न केल्यास संबंधित खातेप्रमुख/कार्यालय प्रमुखांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करावी अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

५) ग्रामविकास विभागाकडील दिनांक ०९ सप्टेंबर,२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार प्राथमिक शिक्षक,पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी,आरोग्य सेवक व आरोग्य सहायक मुख्यालयी राहत असल्याबाबत संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचा ठराव बंधनकारक आहे.

६) जिल्हा परिषदेने या संदर्भात दिनांक ०८ डिसेंबर,२०२१ व दिनांक ३० जुन,२०२२ रोजी परिपत्रक निर्गमित केलेले असुन त्यामध्ये ६ मुद्यांबाबत पडताळणी करावी अन्यथा संबंधितांचे संदर्भात वस्तुस्थिती तपासून गुणवत्तेनुसार किरकोळ / गंभीर स्वरुपाची शिक्षा करावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**-: परिपत्रक :-**

१) संबंधित क्षेत्रीय कर्मचारी निर्देशित मुख्यालयी राहत असेल तर ग्रामसभेचा ठराव प्राप्त करुन घ्यावा. कार्यालय प्रमुखांनी आणि विभाग प्रमुखांनी जर कर्मचारी शासकीय निवासस्थानात वास्तव्य करीत असेल तर तसे प्रमाणित करावे किंवा जे कर्मचारी भाडयाच्या जागेत राहत असतील तर भाडेकरार केल्याच्या दस्तऐवजाची मागणी करावी , आणि ते अभिलेखात ठेवावेत.

२) मुख्यालयातील उपस्थितीबाबत बायोमेट्रीक हजेरी तसेच आकस्मिक पडताळणी या सारख्या बाबींचा अवलंब करावा आणि जर कर्मचारी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय मुख्यालयात राहत नसल्याची खात्री झाल्यास त्या संदर्भात शिस्तभंगविषयक कार्यवाही पार पाडावी.

३) जे कर्मचारी मुख्यालयात राहत नाहीत त्यांचे संदर्भात घरभाडे भत्ता रोखून धरण्यात यावा.

Scanned with CamScanner

४) उपरोक्तप्रमाणे कार्यवाही पार न पाडणाऱ्या कार्यालय प्रमुख/ विभाग प्रमुख यांचेबाबत शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५) जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे बाबतीत महाराष्ट्र जिल्हा परिषद,जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियमांच्या कोणत्याही तरतुदींचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व संबंधित कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणण्यात याव्यात व शासनाच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे वेळोवेळी कार्यवाही पार पाडण्यात यावी.

सही/-
( नीलेश र.गटणे) भाप्रसे
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद औरंगाबाद

प्रत:-

१.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद
२.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,औरंगाबाद
३.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद
४.सर्व खाते प्रमुख, जिल्हा परिषद,औरंगाबाद
५.सर्व गट विकास अधिकारी,पंचायत समिती जिल्हा औरंगाबाद
मार्फत पंचायत समिती
६.सर्व तालुकास्तरीय कार्यालय प्रमुख(उप विभाग,एबाविसेयो,तालुका आरोग्य,पविअ कार्यालय)
७.सर्व ग्रामस्तरावरील कार्यालय प्रमुख (ग्रामपंचायत,प्रशाला,प्रा.आ.केंद्र,पशु.वै.दावाखाना,प्राथ.शाळा)

( नीलेश र.गटणे) भाप्रसे
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद औरंगाबाद
20.1.22

Scanned with CamScanner